# उच्च शिक्षणात गुणवत्ता वाढीसाठी आय.क्यू ए.सी. तसेच नॅंकचे अन्यासाधारण महत्व :-मा. श्री. मिठूलालजी अग्रवाल

उच्च शिक्षणात गुणवत्ता वाढीसाठी आय.क्यू ए.सी. तसेच नॅंकचे अन्यासाधारण महत्व आहे शैक्षणिक गुणवत्ता साध्य करण्यासाठी संस्था सर्व सहकार्य करेल असे उदगार माँ मिठूलालजी अग्रवाल यानी काढले येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे आय. क्यू ए.सी. व नॅंक कार्यालयाचे उदघाटन संस्थेचे चेअरमन मा. श्री. मिठूलालजी अग्रवाल यांच्या हस्ते दि ३० सप्टेंबर २०२० रोजी संपन्न झाले.

आय. क्यू ए. सी. म्हणजेच अंतर्गत गुणवत्ता हमी सेल ही उच्च शिक्षण संस्थेचा एक अविभाज्य घटक आहे ते एक केंद्र बिंदू म्हणून काम करते. महाविद्यालयातील गुणवत्तेला प्राधान्य देणे, शैक्षणिक व प्रशासकीय उपक्रमाचे मापदंड ठरविणे तसेच नॅंक साठी लागणाऱ्या कागद्पंत्रांची पूर्तता करण्याचे कार्य आय. क्यू ए. सी. करते. या सर्व गोष्टी जर एका छता खाली आल्या तर सर्व सुरक्षित राहतील व सर्व कार्य सुरळीतपणे घडेल हाच उदेश्य डोळ्यासमोर ठेऊन महविद्यालयात आय. क्यू ए. सी. व नॅंक कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे सचिव मा. श्री. विकासभाऊ कोटेचा, संस्थेचे जेष्ठ संचालक मा. अँड श्री. प्रकाशचंदजी सुराणा, महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी, उप-प्राचार्य देवसिंग पाटील, महाविद्यालय विकास समिती, आय.क्यू.ए.सी. व नॅंक स्टीअरिन्ग कमिटीचे सर्व सदस्य तसेच उपस्थित होते.

सदर उद्घाटना प्रसंगी मा. अँड श्री. प्रकाशचंदजी सुराणा, मा. श्री. विकासभाऊ कोटेचा, महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात उच्च शिक्षणात गुणवत्ता वाढीसाठी आय. क्यू ए. सी. व नॅंक चे अन्यासाधारण महत्व असल्याची भावना मा. श्री. मिठूलालजी अग्रवाल यांनी व्यक्त केली. सदर उद्घाटन समारंभाच्या प्रास्ताविकेत आय. क्यू ए. सी. व नॅंक कार्य प्रणाली आय. क्यू ए. सी. चे समन्वयक डॉ. अनिल बारी यांनी विषद केली, आभार प्रदर्शन नॅंक समन्वयक डॉ. चेतन शर्मा तर सूत्रसंचालन डॉ. गीता पाटील यांनी केले.

सदर उपक्रम यशावितेसाठी कार्यालयीन अधीक्षक श्री. बाबुराव हिवराळे, राजू मोपारी, अतुल पाटील, दीपक जोशी, विजय धोबी, अतुल हिवराळे यांनी सहकार्य केले.

नॅंकच्या दिशा-निर्देशानुसार आय. क्यू ए. सी. माध्यमातून महाविद्यालयात नवनवीन उपक्रमांना चालना देणे की काळाची गरज - प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी.




Internal Quality Assurance Cell


Internal Quality Assurance Cell
NAAC Steering Committee